क्र.२/नसवि/प्रशासक/०४/२०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १२ जुलै २०२४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## प्रशासक सभा क्रमांक - ०४/२०२४-२०२५
## स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.१५/०७/२०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

## परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०१/०७/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०५/०६/२०२४ ते दि.११/०६/२०२४, दि.१२/०६/२०२४ ते १८/०६/२०२४, आणि दि.१९/०६/२०२४ ते दि.२५/०६/२०२४ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

३. महानगरपालिकेतील बांधकाम विभाग,नगररचना विभाग,पाणी पुरवठा व जलनि:सारण विभाग, अग्निशमन विभाग या महत्वाच्या विभागांच्या आस्थापनेवर रिक्त पदांवर विविध संवर्गातील मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंग) एजन्सी नियुक्ती करणेस रितसर जाहिर निविदा WWW.Mahatenders.Gov.in या वेबसाईटवर व दोन दैनिक वृत्तपत्रामध्ये निविदा प्रसिद्ध करुन दर मागविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त,मुख्यालय (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. महानगरपालिकेच्या ॲलो.दवाखाने, प्रसुतिगृहे यांना सन २०२४-२५ सालामध्ये लागणारी ॲलो.औषधे, केमिकल्स, एक्स-रे साहित्य इ. ४६६ औषधे खरेदी करणेकामी जीईएम पोर्टलद्वारे मागविणेत आलेल्या निविदा वाटाघाटीअंती विषयपत्रातील नमुद दराने जरुरीनुसार खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१२/०७/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

**मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने** }

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १६** **दिनांक :- १५/०७/२०२४**

**विषय क्रमांक :- ०१**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०१/०७/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१२ ते ठराव क्र.१५ हे वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती लिपिक
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १७** **दिनांक :- १५/०७/२०२४**

**विषय क्रमांक :- ०२**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०५/०६/२०२४ ते दि.११/०६/२०२४, दि.१२/०६/२०२४ ते १८/०६/२०२४, आणि दि.१९/०६/२०२४ ते दि.२५/०६/२०२४ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेवून ही सभा परत पाठवित आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्य अग्निशमन अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १८** **दिनांक :- १५/०७/२०२४**

**विषय क्रमांक :- ०३**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे उपायुक्त,मुख्यालय (आस्थापना विभाग) यांचे दि.१२/०७/२०२४ रोजीचे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महानगरपालिकेतील बांधकाम विभाग, नगररचना विभाग,पाणी पुरवठा व जलनि:सारण विभाग, अग्निशमन विभाग या महत्वाच्या विभागांच्या आस्थापनेवरील कार्यरत कर्मचारी नियम वयोमान, स्वेच्छानिवृत्ती झालेमुळे बहुतांशी पदे रिक्त झाली आहेत. यामुळे सदर विभागांचे दैनंदिन कामकाज पार पाडणे अडचणीचे होत असल्याकारणाने संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांकडून सातत्याने मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत महापालिका प्रशासनाकडे मागणी होत आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदांची भरती प्रक्रिया अद्याप प्रस्तावित झाली नसून याबाबतची कार्यवाही पुर्ण होण्यास बराच अवधी लागणार असल्याने महापालिकेचा दैनंदिन कामाकाजांची आवश्यकता पाहता शासन परिपत्रकांनुसार बाह्ययंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करुन घेण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.२९/१६/वित्तीय सुधारणा-१ मंत्रालय,मुंबई दि.०२ ऑगस्ट २०१६ चे परिपत्रकानुसार करणे योग्य होणार आहे.

त्यानुसार महापालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)-२१ पदे,स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक - १२ पदे, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)-२ पदे, सिस्टिम इंजिनिअर (BPMS) -७पदे पंपचालक (पंप ऑपरेटर)-२० पदे, चालक – यंत्रचालक (Driver Operator)-१२ पदे, अग्निशामक (Fireman)- ४० पद, व्हॉलमन-२० पदे, बहुउद्देशिय कामगार-४० पदे या संवर्गातील एकूण १७४ पदे मनुष्यबळाचा पुरवठा करण्याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार सदर पदांचा प्रतिमहिना व वार्षिक खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे...

| अ. क्र. | संवर्ग | विभागांची मागणी | एकूण पद संख्या | एकूण किमान वेतन | प्रति महिना खर्चाचा अंदाज | वार्षिक खर्चाचा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | बांधकाम - ११<br>पाणी पुरवठा - ८<br>जलनि:सारण - २ | २१ | २१,८४०/- | ४,५८,४६०/- | ५५,०३,६८०/- |
| २. | स्थापत्य आभियांत्रिकी सहाय्यक | बांधकाम – १२ | १२ | २१,८४०/- | २,६२,०८०/- | ३१,४४,९६०/- |
| ३. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | जलनि:सारण - २ | ०२ | २१,८४०/- | ४३,६८०/- | ५,२४,१६०/- |
| ४. | सिस्टीम इंजिनिअर (BPMS) | नगररचना - ७ | ०७ | २१,८४०/- | १,५२,८८०/- | १८,३४,५६०/- |
| ५. | पंप चालक (पंप ऑपरेटर) | पाणी पुरवठा -- २० | २० | २१,८४०/- | ४,३६,८००/- | ५२,४१,६००/- |
| ६. | चालक यंत्रचालक (Driver Operator) | अग्निशमन - १२ | १२ | २१,८४०/- | २,६२,०८०/- | ३१,४४,९६०/- |
| ७. | अग्निशामक (Fireman) | अग्निशमन - ४० | ४० | २१,८४०/- | ८,७३,६००/- | १,०४,८३,२००/- |
| ८. | व्हॉलमन | अग्निशमन - २० | २० | १९,३४०/- | ३,८६,८००/- | ४६,४१,६००/- |
| ९. | बहुउद्देशिय कामगार | पाणी पुरवठा – ४० | ४० | १९,३४०/- | ७,७३,६००/- | ९२,८३,२००/- |
| | | **एकूण** | **१७४** | – | **३६,५०,१६०/-** | **४,३८,०१,९२०/-** |

... २ ...

उपरोक्त प्रमाणे साठी बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंग) मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावयाचे झाल्यास प्रतिमहिना र.रु.३६,५०,१६०/- व वार्षिक खर्च र.रु.४,३८,०१,९२०/- इतका वेतनापोटी अंदाजे खर्च होणार आहे. सदर खर्चाबाबत वित्त विभाग,शासन परिपत्रक दि.०२ फेब्रुवारी २०१३ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार कार्यालयीन खर्च या अभिनामाचे स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करणे उचित होणार आहे.

वरील प्रमाणे नमुद केलेनुसार १७४ पदे बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिंग) कंत्राटी पद्धतीने / कंपनीमार्फत मनुष्यबळ पुरविणेकामी रितसर जाहिर निविदा WWW.Mahatenders.gov.in या वेबसाईटवर व दोन दैनिक वृत्तपत्रामध्ये निविदा प्रसिद्ध करुन, आवश्यकतेनुसार महापालिकेच्या शर्ती-अटी नमुद करुन दर मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

- उपरोक्त एजन्सी नियुक्तीकामी कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तर दायित्व महापालिका प्रशासनावर राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- उपरोक्त बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणेकामी सर्व विभागाकडून आवश्यक मागणी विचारात घ्यावी.
- नियुक्त करावयाच्या मनुष्यबळासाठी किमान वेतन निश्चित करणेत यावे.
- निविदा करार, कामगार कायदा विधी तज्ञ यांचेकडून अंतिम करुन घेणेत यावे.
- उपरोक्त बाह्ययंत्रणा / कंपनी साठी १% ते ३% पर्यत मोबदला निश्चित करणेत यावे.
- नियुक्ती करावयाच्या कर्मचाऱ्यांचे EPF व ESIC भरणेची जबाबदारी संबंधीत बाह्ययंत्रणा/ कंपनी यांची राहील.

उपरोक्त कामी जाहिर निविदा मागविताना व दर करार करताना वरील सूचनांनुसार पुढील कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

All pages signed,

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासन अधिकारी (आस्था.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १९** **दिनांक :- १५/०७/२०२४**

**विषय क्रमांक :- ०४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१२/०७/२०२४ रोजीचे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महानगरपालिकेच्या ॲलो.दवाखाने, प्रसुतिगृहे यांना सन २०२४-२५ सालामध्ये लागणारी ॲलो.औषधे, केमिकल्स, एक्स-रे साहित्य इ. ४६६ औषधे खरेदी करणेकामी जीईएम पोर्टलद्वारे मागविणेत आलेल्या आले नुसार विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा मधील निविदा दरापेक्षा कमी दर प्राप्त झालेले २३८ औषधे, निविदा दरापेक्षा जास्त दर प्राप्त झालेली २२१ औषध व निविदा दराप्रमाणे प्राप्त ७ औषधांकरीता दर प्राप्त झालेने मा.आयुक्तसो यांचेशी वाटाघाटीअंती एकूण ४६६ औषधांपैकी निविदा दरापेक्षा कमी दर प्राप्त झालेले ४३८ औषधे, निविदा दरापेक्षा जास्त प्राप्त झालेले १९ औषधे व निविदा दराप्रमाणे प्राप्त ९ औषधे असे एकूण ४६६ औषधांकरीता दर प्राप्त झालेले असून, पैकी जेनरीकार्ट मेडिसीन यांचेकडून जादा दराने प्राप्त झालेले २ औषधे निविदा दराने देणेकरीता तसेच, श्री.गजानन फार्मा,पुणे यांचे जादा दराने प्राप्त असलेली १७ औषधे निविदा दराप्रमाणे देणेकरीता पत्र दिले असता, दोन्ही निविदाधारक यांनी एस्टीमेट दराने देणेस तयार असलेबाबत लेखी पत्र दिलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे...

| अ.क्र. | मक्तेदाराचे नाव | प्राप्त झालेले निविदा दर | बाजारभावापेक्षा कमी दराने प्राप्त झालेले दर | बाजारभावाप्रमाणे प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | जेनरीकार्ट मेडिसीन,मिरज | १६६ | १५८ | ०८ |
| २. | रेणुका सेल्स,चंद्रपुर | १५० | १४९ | ०१ |
| ३. | श्री.गजानन फार्मा,पुणे | १५० | १३१ | १९ |
| | **एकूण** | **४६६** | **४३८** | **२८** |

त्यानुसार उपरोक्त प्रमाणे (१) जनेरीकार्ट मेडिसीन,मिरज यांचेकडून १६६ औषधे, (२) श्री.गजानन फार्मा.पुणे यांचेकडून १५० औषधे व (३) रेणुका सेल्स,चंद्रपुर यांचेकडून १५० औषधे असे एकूण ४६६ औषधे सन २०२४=२५ करिता आवश्यकतेनुसार जीईएम पोर्टलवरुन वार्षिक दर करार करुन खरेदी करणेस व त्याकामी येणारे र.रु.७० लाख मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च सन २०२४-२५ मधील ई-४१६ - औषधे खरेदी या लेखाशिर्षातील तरतुदी मधून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

वैद्यकिय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका